# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

क्रमांक : १२/जब/एफ -०२२१
दिनांक : २४/१२/२०००.

प्रति,
विभाग अधिकारी,
के / पश्चिम विभाग,
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय,
अंधेरी बेस्ट बस स्टेशन समोर,
स्वामी विवेकानंद मार्ग, अंधेरी (प),
मुंबई - ४०० ०५८.

विषय :- <u>जमिन - मुंबई उपनगर जिल्हा.</u>
नियोजित फिशरीज युनिव्हर्सिटी, यारी रोड, वर्सोवा येथे लोखंडवाला कॉम्लेक्स आणि पंच मार्ग येथील दोन डी. पी . रोड बांधणारा पूल बांधण्यास परवानगी मिळण्याबाबत.

महोदय,

मेसर्स वर्सोवा वेल्फेअर असोसिएशनला लिहिलेले आपले पत्र क्र.के डब्ल्यू/९१६/एटीएम/ओडी दिनांक .२.१२.२००१ कृपया पहावे.

मौजे वर्सोवा येथील लोखंडवाला कॉम्लेक्स आणि पंच मार्ग येथे दोन डी.पी.रोड सांधणारा पूल बांधण्याचा वर्सोवा वेल्फेअर असोसिएशनचा प्रस्ताव आपण संदर्भाधीन पत्रातील अटी/ शर्तीवर मंजूर केला आहे. त्या मधील १ ल्या अटीनुसार आपण असोसिएशनला प्रस्तावित पुलाच्या बांधकामासाठी जमीन मालकाची नाहरकत मिळविण्यास सांगितले आहे. त्याअनुषंगाने वर्सोवा वेल्फेअर असोसिएशनने त्यांच्या दिनांक १२.१२.२००० च्या पत्राने प्रस्तावित पुलाच्या बांधकामास परवानगी मिळावी म्हणून या कार्यालयाकडे विनंती केली आहे.

वस्तुतः डी. पी. रोड खालील शासकीय जमीन मुंबई महानगर पालिकेस हस्तांतर केली जाते. त्यासाठी रितंसर प्रस्ताव महापालिकेकडून या कार्यालयास प्राप्त होणे आवश्यक आहे. त्यामुळे कृपया तसा प्रस्ताव रस्त्याखाली येणारे क्षेत्र चौ. मीटर मध्ये नमूद करुन जमिन दर्शविणा-या नकाशाच्या ५ प्रतींसह या कार्यालयास सादर करावा म्हणजे प्रश्नाधीन जमिन महापालिकेस हस्तांतर करणेकामी या कार्यालयास कार्यवाही करणे शक्य होऊ शकेल.

दरम्यान, वर्सोवा वेल्फेअर असोसिएशनने पूलाच्या बांधकामास ना हरकत मिळावी म्हणून या कार्यालयाकडे प्रस्ताव दिला असला व महापालिकेने बांधकामाचा प्रस्ताव मंजूर केला असला तरी रस्त्याखालील जमिनींचा विकास मुंबई महानगर पालिके मार्फत / मार्गदर्शनाखाली होणे आवश्यक आहे. मात्र महापालिका पूलाचे बांधकाम खाजगी विकासकाकडून करुन घेणार असे दिसत असल्याने खालिल अटी / शर्तीवर मुंबई महानगर पालिके पूलाचे बांधकाम करण्यास ना हरकत देण्यात येत आहे.

(२२)

अटी / शर्ती

१) मुंबई महानगर पालिकेचे पत्र क्र.के. डब्ल्यू/९१६/ए टी एम/ ओ डी दिनांक २.१२.२००० मधील सर्व अटी / शर्तीचे पालन व्हावे.

२) नियोजित पूलाच्या बांधकाम खर्चाचा बोजा शासनावर पडता नये. तसेच भविष्यातही झालेल्या खर्चाची मागणी शासनाकडे करता येणार नाही.

३) पूलाचे बांधकाम करुन घेतले तरी जमिनीची मालकी शासनाकडेच राहील. जागेवर बांधकाम केले या आधारे जागेवर कोणत्याही प्रकारचा हक्क / अधिकार सांगता येणार नाही.

४) पूलाचा वापर सार्वजनिकरित्या वापरासाठी कोणतेही शुल्क आकारावयाचे नाही.

५) जागेची मालकी शासनाकडेच राहाणार असल्याने ज्यावेळी डी. पी. रोड खालील क्षेत्र महापालिकेस हस्तांतर करण्याचा निर्णय शासन घेईल त्यावेळी जागा महापालिकेस हस्तांतर करताना पुलाचे बांधकामही आपोआप महापालिकेकडे हस्तांतर होईल.

६) वरील अटी / शर्तीव्यतिरिक्त आवश्यक तर शासन ज्या अतिरिक्त अटि /शर्ती लादेल त्या अटी / शर्ती ही महापालिकेस मान्य कराव्या लागतील व त्याचे पालन करावे लागेल.

खाळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा. करीता

प्रतिलिपी :- १) वर्सोवा वेल्फेअरअसोसिएशन , अमरनाथ टॉवर सहकरी गृहनिर्माण संस्था ( नियोजित), कैलाश सरोवर संकुल, विस्तारित यारी रोड , अंधेरी (प), मुंबई - ४०० ०६१ यांजकडे माहितीसाठी रवाना.

२) कार्यकारी अभियंता, विकास आराखडा, बृहन्मुंबई महानगर पालिका कार्यालय, विस्तारीत इमारत, ४ था मजला महापालिका मार्ग , फोर्ट मुंबई यांजकडे माहितीसाठी रवाना.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की प्रश्नाधिन जमीन मुंबई महानगर पालिकेस हस्तांतर करण्याबाबत रितसर प्रस्ताव या कार्यालयास सादर करावा.

३) तहसिलदार अंधेरी यांजकडे माहीतीसाठी रवाना.

खाळ प्रतीवर जिल्हाधिकारी
यांची सही असे.

सही/-
जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा करीता.

Scanned by CamScanner